# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ३१/१०/२०१८

## राष्ट्रीय एकात्मतेसाठी धावले नाशिक जिल्हयातील पोलीस व नागरीक ग्रामीण पोलीस दल आयोजित राष्ट्रीय एकता दौडला उत्स्फुर्त प्रदिसाद

---

स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिना निमित्ताने आज दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी **ग्रामीण पोलीस दलातर्फे** जिल्हयात **''राष्ट्रीय एकता दौड''** चे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय एकात्मता व जातीय सलोखा वृध्दींगत व्हावा यासाठी ग्रामीण पोलीस दलातर्फे जिल्हयातील १५ तालुके तसेच ओझर, पिंपळगाव व मनमाड अशा एकुण १८ ठिकाणांवर सदर राष्ट्रीय एकात्मता दौड आयोजित केली होती. सदर मॅरेथॉन स्पर्धेस जिल्हयात पहाटे ०६:०० वा. पासुनच सुरूवात झाली होती, यात शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी, पोलीस व प्रशासकिय सेवेतील अधिकारी व कर्मचारी, सर्वसामान्य नागरीक, राजकिय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, मिडीया प्रतिनिधी व वार्ताहर, समाजसेवक तसेच सर्व जाती-धर्मियांनी एकत्र येवुन भरघोस प्रतिसाद दिला. अबालवृध्दांनीही सदर मॅरेथॉनमध्ये धावत राष्ट्रीय एकतेचा संदेश दिला.

दरम्यान मालेगाव शहरातील **ईदगाह मैदान** परिसरात **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व **आशियाई क्रिडा स्पर्धा २०१८ कांस्यपदक विजेत्या संजीवनी जाधव** यांचे हस्ते फ्लॅग दाखवत एकता दौडचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री.नीलोत्पल, मा.उपविभागीय दंडाधिकारी मालेगाव श्री. अजय मोरे, माजी आमदार मौलाना मुफ्ती इस्माईल, मालेगाव मनपा उपआयुक्त श्री. कापसे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रत्नाकर नवले यांचेसह मालेगाव शहरातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मा.पोलीस अधीक्षक सो यांचेसह उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी ०५ कि. मी. दौड पुर्ण करत सहभाग नोंदविला. मालेगाव शहरवासीयांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिल्याने सुमारे ०३ हजारांहुन अधिक स्पर्धकांनी एकता दौडमध्ये नोंदणी केली होती. यावेळी मालेगावातील हिंदु-मुस्लिम धर्मियांनी एकत्र येवुन राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. राष्ट्राची एकता, अखंडता व सुरक्षा आबाधित राखण्यासाठी, तसेच एकात्मतेचा संदेश ग्रामीण भागातील प्रत्येक नागरीकांपर्यंत पोहचविण्यासाठी **''रन फॉर युनिटी - चला आपण सर्व धावुया''** असा संदेश ग्रामीण **पोलीस अधीक्षक सो** यांनी दिला. तसेच सदर मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदविणारे स्पर्धकांना मा. पोलीस अधीक्षक सो. व उपस्थित मान्यवरांचे हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. त्यानंतर **मालेगाव मॅरेथॉन पर्व-२ स्पर्धेचे** लोगो, पोस्टर व फ्रेम चे अनावरणही यावेळी करण्यात आले, ०६ जानेवारी २०१९ रोजी सदर स्पर्धा पार पडणार असुन आजपासुन विनामुल्य नोंदणी सुरु करण्यात आल आहे.

तसेच सिन्नर, वावी व सिन्नर एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे अंतर्गत आयोजित एकता दौड सिन्नर शहरातील तहसिल कार्यालय ते कानडी मळा परिसरात पार पडली, यावेळी नाशिक जिल्हयाचे **विद्यमान खासदर मा.ना.श्री.हेमंतजी गोडसे**, सिन्नर विधानसभा **आमदार मा.ना.श्री. राजाभाऊ वाजे** यांचे प्रमुख उपस्थिती लाभली, मान्यवरांचे हस्ते फ्लॅग दाखवुन मॅरेथॉनला सुरुवात झाली. सिन्नर तालुक्यातील शाळा महाविद्यालयांमधील विद्यार्थी, स्थानिक नागरीक, सामाजिक व राजकिय कार्यकर्ते, प्रशासकिय अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदवत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. यावेळी सिन्नर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री.मुकूंद देशमुख, एम.आय.डी.सी.सिन्नर पोस्टे चे पोलीस निरीक्षक श्री. एस.टी.पाटील, वावी पो.स्टे.चे सहा.पोलीस निरीक्षक संदिप बोरसे यांचेसह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

चांदवड तालुक्यातही **चांदवड व वडनेर भैरव पोलीस स्टेशनच्या** वतीने एकता दौड आयोजित करण्यात आली होती, चांदवड - लासलगाव चौफुली ते निमगव्हाण मार्गावर सदर मॅरेथॉन पार पडली, यावेळी प्रमुख अतिथी **विद्यमान आमदार श्री. राहुल आहेर**, उपविभागीय दंडाधिकारी श्री. सिध्दार्थ भंडारे, मा.तहसिलदार श्री.शदर मंडलीक, तसेच इतर प्रशासकिय अधिकारी व प्रतिष्ठीत नागरीक उपस्थित होते. चांदवड तालुक्यातील शालेय विद्यार्थी व स्थानिक नागरीकांनी राष्ट्रीय एकात्मतेसाठी धाव घेत सर्वधर्म समभाव असा संदेश दिला. यावेळी उपस्थित स्पर्धकांना टी-शर्ट, कॅप व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले, सदर स्पर्धेस चांदवड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. संजय पाटील, वडनेर भैरव पो.स्टे.चे सहा.पोलीस निरीक्षक श्री. सचिन साळुंखे यांचेसह पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. तसेच **दिंडोरी तालुक्यात** वणी व दिंडोरी पोलीस ठाणे आयोजित एकता दौड पोलीस सखी मंच, सामाजिक संस्था सदस्य, तसेच शालेय विद्यार्थी, प्रशासकिय कार्यालयांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरीक यांचे उपस्थितीत उत्सहात पार पडली. दिंडोरी पोलीस ठाणे पासुन सुरू झालेल्या एकता दौडमध्ये **नाशिक ग्रामीण पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) श्री. सुरेश जाधव**, दिंडोरीचे तहसिलदार श्री. बाबासाहेब गाढवे, तसेच परनार्ड कंपनीचे व्यवस्थापक श्री संजय कुंठीया, दिंडोरी पो.स्टे. पोलीस निरीक्षक श्री. अनिलकुमार बोरसे, वणी पो.स्टे. सपोनि प्रविण पाडवी यांनी सहभाग नोंदविला. यावेळी सहभागी स्पर्धकांना मान्यवरांचे हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.

**निफाड व लासलगाव पोलीस ठाणे** अंतर्गत राष्ट्रीय एकता दौड उगाव त्रिफुली परिसरात पार पडली, यावेळी मा.उपविभागीय दंडाधिकारी श्री.महेश पाटील, व मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. माधव पडीले, निफाडचे पहिले नगराध्यक्ष श्री.राजाभाउ शेलार, निफाड पो.स्टे. चे पोलीस निरीक्षक श्री. विष्णु आव्हाड, लासलगाव पो.स्टे.चे सपोनि श्री. पांढरे यांचेसह पोलीस अधिकारी व कर्मचा-यांनी मोठया प्रमाणात सहभाग नोंदविला. निफाड डॉक्टर असोसिएशन, गुड मॉर्निंग ग्रुप लासलगाव, पार्थ करीअर ॲकेडमी, पॉवर हाउस करीअर ॲकेडमी, पोलीस सखी ग्रुप यांचेसह प्रतिष्ठीत नागरीकांनी सदर एकता दौडमध्ये उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. **येवला शहरातील** एस.एन.डी.कॉलेज ते मार्केट कमिटी परिसरात राष्ट्रीय एकता दौड पार पडली, येवला शहर व तालुका पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग नोंदवत एकात्मतेसाठी धाव घेतली, यावेळी उपविभागीय दंडाधिकारी श्री.भिमराज दराडे, येवला नगराध्यक्ष श्री. बंडु क्षिरसागर यांचेसह लोकप्रतिनिधी, ज्येष्ठ नागरीकांनी उपस्थिती नोंदविली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे हस्ते प्रत्येक स्पर्धकास प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

नाशिक ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने राष्ट्रीय एकात्मतेसाठी आयोजित केलेली एकता दौड स्तुत्य उपक्रम असुन नागरीकांनी दिलेला प्रतिसाद कौतुकास्पद आहे. यावेळी तरूण पिढीसह अबालवृध्दांनीही धावण्याचा अनुभव घेतला, थकले तरीदेखील एकतेसाठी धावायचे आहे, असा उत्साह स्पर्धकांमध्ये दिसुन आला. मॅरेथॉन मार्गावर स्पर्धकांचा उत्साह वाढवण्यासाठी जागोजागी देशभक्तीपर गिते, ढोलताशा पथक तसेच सांस्कृतिक कार्यक्रम, पथनाटयांचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान विविध सामाजिक संस्थांकडुन मॅरेथॉन मार्गावर स्पर्धकांसाठी स्टॉलस्सह प्राथमिक उपचार केंद्र, सुसज्ज ॲम्ब्युलन्स सुविधा तैनात करण्यात आली होती. जिल्हयातील १५ तालुके, तसेच ओझर, पिंपळगाव व मनमाड अशा एकुण १८ ठिकाणांवर आयोजित राष्ट्रीय एकात दौड उत्सहात पार पडली. एकत्मतेसाठी धाव घेणारे प्रत्येक स्पर्धकाचे चेह-यावर आनंद दिसत होता. मॅरेथॉन समारोप प्रसंगी विविध ठिकाणचे कार्यक्रमस्थळी सांस्कृतिक कार्यक्रमांनी सहभागी स्पर्धकांना प्रोत्साहीत केले, यावेळी एकता दौडमध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धकास उपस्थित मान्यवरांचे हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले तसेच राष्ट्राची एकता, अखंडता व सुरक्षा अबाधित रहावी यासाठी सर्व ठिकाणी राष्ट्रीय एकता दिवस शपथ घेण्यात आली.

---ooo---